बुधवार, दि १७ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक १५ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# पत्रकार परिषद की निवडक प्रचार? पत्रकारितेच्या पारदर्शकतेवर घाला

## मोजक्या 'युट्युब युट्युबवाल्यां'पुरतीच सदर बाजार पोलीसांची पत्रकार परिषद; केंद्र सरकारच्या २०२३ च्या डिजिटल मीडिया नियमांचा उघड भंग?

दीपक शेळके

जालना - डिबी पथकाच्या कारवाईनंतर माहिती देण्यासाठी सदर बाजार पोलीस ठाणे येथे आयोजित करण्यात आलेली पत्रकार परिषद सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. विशेष म्हणजे या पत्रकार परिषदेला उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी स्वतः उपस्थित राहून माहिती दिली. मात्र या पत्रकार परिषदेसाठी फक्त मोजक्या, ठराविक युट्युब चॅनल चालविणाऱ्यांना निमंत्रण देण्यात आल्याचे पुढे आले असून, या प्रकारामुळे पत्रकारितेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या पत्रकार परिषदेला जिल्ह्यातील एकाही प्रिंट मीडियाच्या प्रतिनिधीला निमंत्रण देण्यात आले नव्हते, ही बाब विशेष आणि धक्कादायक आहे. परंपरेने शासकीय व पोलीस प्रशासनाच्या पत्रकार परिषदांमध्ये सर्व मान्यताप्राप्त प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल माध्यमांना समान वागणूक दिली जाते. मात्र येथे तसे झाले नसल्याचे दिसून येते.

यामुळे सदर बाजार पोलीस ठाण्याने काही युट्युब चॅनल्सना अधिकृत पत्रकारितेची संमती दिली आहे का? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

### वरिष्ठ पोलीस अधिकारी या प्रश्नांची उत्तरे देणार का?

सदर बाजार पोलीस ठाण्याने पत्रकार परिषदेसाठी फक्त निवडक युट्युब चॅनल्सनाच निमंत्रण का दिले? प्रिंट मीडियाच्या प्रतिनिधींना डावलण्याचे नेमके कारण काय? युट्युब चॅनल्सना पत्रकार परिषदेला बोलावण्यापूर्वी केंद्र सरकारच्या २०२३ च्या डिजिटल मीडिया नियमांचे पालन तपासले का? जालना जिल्ह्यातील युट्युब चॅनल्स नोंदणीकृत व तक्रार निवारण यंत्रणेसह कार्यरत आहेत का? पोलीस प्रशासनाकडून युट्युब चॅनल्सना अधिकृत पत्रकारितेची मान्यता देण्यात आली आहे का? भविष्यात सर्व पत्रकार परिषदांसाठी प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल माध्यमांना समान निमंत्रण देण्याचे धोरण ठरवले जाईल का? या प्रकारामुळे खोटी किंवा एकतर्फी माहिती प्रसारित होण्याचा धोका प्रशासनाला जाणवत नाही का? संबंधित अधिकाऱ्यांवर आंतरिक चौकशी किंवा मार्गदर्शक सूचना देण्यात येणार आहेत का? पत्रकार परिषदांचे मानक कार्यपद्धती (SOP) जिल्ह्यात अस्तित्वात आहे का? लोकशाहीतील उत्तरदायित्व राखण्यासाठी प्रशासन काय ठोस पावले उचलणार?

**केंद्र सरकारचे २०२३ चे डिजिटल मीडिया नियम काय सांगतात?**

केंद्र सरकारने २०२३ मध्ये डिजिटल मीडिया, सोशल मीडिया व युट्युब चॅनलसाठी कडक नियम, आचारसंहिता व जबाबदारीचे निकष लागू केले आहेत. हे नियम प्रामुख्याने Ministry of Electronics and Information Technology यांच्या अधिपत्याखाली अंमलात आणण्यात आले आहेत.

या नियमांनुसार युट्युब चॅनल हे स्वतंत्र पत्रकारिता माध्यम नसून डिजिटल प्लॅटफॉर्मवरील कंटेंट क्रिएटर म्हणून गणले जातात. बातमीसदृश कंटेंट देणाऱ्यांना नोंदणी, जबाबदारी, तक्रार निवारण यंत्रणा बंधनकारक आहे. खोटी, दिशाभूल करणारी किंवा सनसनाटी माहिती पसरविण्यास मनाई आहे. शासकीय यंत्रणांनी फक्त अधिकृत व जबाबदार माध्यमांनाच माहिती देताना काळजी घेणे अपेक्षित असताना, या नियमांचे पालन जालना जिल्ह्यातील युट्युब चॅनल्स करतात का? हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

**पोलीस प्रशासनाकडून नियमांना हरताळ?**

सदर बाजार पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी फक्त युट्युब चॅनल चालविणाऱ्यांना पत्रकार परिषदेस बोलावून, केंद्र सरकारच्या नियमांनाच धाब्यावर बसविले असल्याचा आरोप होत आहे. यामुळे प्रशासनच जर नियम तोडत असेल, तर सामान्य नागरिकांनी नियमांचे पालन करायचे तरी कसे? असा सवाल उपस्थित होत आहे.



पत्रकार परिषद ही लोकशाहीतील उत्तरदायित्वाचे माध्यम आहे. माहिती सर्व माध्यमांपर्यंत समान पद्धतीने पोहोचणे अपेक्षित असते. मात्र निवडक 'लाळघोटी' पत्रकारांनाच माहिती देऊन वस्तुनिष्ठ पत्रकारितेवर गदा आणण्यात येत आहे.

**प्रिंट मीडियाची उपेक्षा**

दिशाभूल करणारी एकतर्फी माहिती प्रसारित होण्याचा धोका, अशा गंभीर बाबी पुढे येत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, या संपूर्ण प्रकरणाची जिल्हा पोलीस अधीक्षक व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. पत्रकार परिषदांसाठी सर्व माध्यमांना समान निमंत्रण, केंद्र सरकारच्या डिजिटल मीडिया नियमांचे काटेकोर पालन, युट्युब चॅनल व अधिकृत पत्रकारिता यामधील स्पष्ट भेद हे धोरण ठरविणे आता अपरिहार्य बनले आहे.

अन्यथा युट्युब पत्रकारिता आणि अधिकृत पत्रकारिता यातील सीमारेषा पुसट होऊन प्रशासनाची विश्वासार्हताच धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

दिल्लीत 'शिवकालीन शस्त्रसंग्रहालय' उभारण्याचे सांस्कृतिक मंत्र्यांचे आश्वासन!

# 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'तील शस्त्रप्रदर्शनातून राष्ट्रभक्तीचा जागर!






**नवी दिल्ली । प्रतिनिधी** - देशाच्या राजधानीतील भारत मंडपम् येथे झालेल्या भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'तील 'स्वराज्य का शौर्यनाद' या प्रदर्शनीद्वारे राष्ट्रभक्ती, ईश्वरीकृपा आणि शौर्याची शक्ती यांचा अद्वितीय संगम साधला. भारत मंडपम प्रांगणातील हॉल क्र. १२ मध्ये १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत या प्रदर्शनीमध्ये शिवकालीन शस्त्रप्रदर्शन, वंदे मातरम प्रदर्शन, आध्यात्मिक मूल्य असलेल्या वस्तूंचे प्रदर्शन, यांसह ग्रंथप्रदर्शनही लावण्यात आले होते.

या प्रदर्शनात विद्यार्थी, पालक, हिंदुत्वनिष्ठ आणि विविध मान्यवरांना शिवकालीन शस्त्र केवळ पाहण्यासाठीच नव्हे, तर तेजस्वी राष्ट्रपुरुषांच्या काळातील शस्त्रे प्रत्यक्ष हाताळण्याची संधी देण्यात आली. या दैवी स्पर्शातून हिंदवी स्वराज्याच्या काळातील पराक्रम आणि शौर्य याची जिवंत अनुभूती उपस्थितांच्या मनात निर्माण झाली. या निमित्ताने दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा यांनी दिल्लीत कायमस्वरुपी 'शिवकालीन शस्त्रसंग्रहालय' स्थापन करण्याचे आश्वासनही दिले.

या प्रदर्शनाला भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. उदय लळीत, केंद्रीय सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय उर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. संजय सेठ, राज्यसभा सदस्य, तसेच भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. सुधांशू त्रिवेदी, दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा यांसह संत-महंत, प्रशासकीय अधिकारी, वरिष्ठ पत्रकार, संपादक, साहित्यिक, पोलीस अधिकारी, उद्योगपती, **पान २ वर**

# शुक्रवारी भाजपच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

## भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना महानगर च्या वतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दि. १९ डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी सकाळी १0.00 वा भारतीय जनता पार्टी कार्यालय, संभाजीनगर, जालना येथे घेण्यात येणार आहे.



यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री मा.रावसाहेब पाटील दानवे, भाजपा जालना महानगरपालिका निवडणूक प्रभारी खा.डॉ.भागवत कराड, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे, जालना महानगरपालिका निवडणूक प्रमुख माजी आ. कैलास गोरंटयाल, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, माजी शहराध्यक्ष राजेश राऊत, अशोक पांगारकर, सतीश जाधव, विजय कामड, विमलताई आगलावे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

त्याचबरोबर मुलाखतीस येणाऱ्या व राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस येताना आपण ज्या राखीव प्रवर्गातून निवडणूक लढवू इच्छितो ते जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, मतदान कार्ड व आपल्याकडे असलेल्या सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत आहे.

## संपादकीय

# मूल्यशिक्षण काळाची गरज

दोन तीन महिन्यांपूर्वी झालेल्या भांडणातून दहावीच्या विद्यार्थ्याने खाजगी शिकवणी वर्गातील सहाध्यायी विद्यार्थ्याचा शिकवणी सुरू असतानाच धारधार शस्त्राने मानेवर आणि पोटावर वार करून निर्घुण खून केल्याची घटना पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर येथे सोमवारी घडली. पुण्यासारख्या शिक्षणाच्या माहेरघरात घडलेल्या या घटनेतील आरोपी शाळकरी असल्याने सर्वत्र खळबळ माजली आहे अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गंभीर गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत. मागील वर्षी पुण्यातच शाळेची बॅग फाडली या किरकोळ कारणाने एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना घडली होती. तीन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. त्याच वर्षी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सण २०२२ - २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. जर एकट्या पुण्यात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण पुण्यातील या व या आधीच्या घटनेने तसेच जालन्यातील घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे सर्व मुले शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत. भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वसतुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि क्षिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.

# गझलेच्या माहौलात कला साहित्य भूषण प्रकाशित

**मुंबई -** गझल नवाझ भिमराव पांचाळे यांनी भाषणबाजी न करता, संगीताची साथ संगत नसताना त्यांच्या गझला पेश करून असा काही माहौल तयार केला की, त्यांच्या अर्थपूर्ण, आर्त सुरांमध्ये उपस्थित रसिक कधी, कसे हरवले, ते त्यांचे त्यांनाच कळाले नाही! त्यांच्या या गायनाने, कला साहित्य भूषण या पुस्तकाचा मुंबईत झालेला प्रकाशन समारंभ रसिकांच्या सदैव स्मरणात राहील.

या पुस्तकाचे लेखक श्री देवेंद्र भुजबळ यांनी या पुस्तकात रेखाटलेल्या व्यक्ति, त्यांची वैशिष्ट्ये,समाजासाठी ते देत असलेले योगदान याविषयी यावेळी माहिती दिली.पुस्तक प्रकाशनासाठी देश विदेशातून प्राप्त झालेल्या मित्रांच्या, स्नेह्यांच्या शुभेच्छा

लाभल्याने आपल्या आनंदात खूपच भर पडली,असेही त्यांनी सांगितले.

कला आणि साहित्य क्षेत्रातील तीस व्यक्तींच्या प्रेरणादायी जीवन कथा असलेल्या या पुस्तकात गझल नवाझ भिमराव पांचाळे, लेखिका आणि कवयित्री सिंगापूर स्थित मोहना कारखानीस, प्रतिभा सराफ, यांच्याही जीवन कथा असल्याने त्यांच्याहस्ते आणि कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर, साहित्यिका गौरी कुलकर्णी डिंपल पब्लिकेशन्सचे अशोक मुळे,भरारी प्रकाशनाच्या लता गुठे, यांच्याहस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पान १ वरुन

### सनातन राष्ट्र ...

अधिवक्ते, लष्करी अधिकारी, हिंदू संघटनांचे प्रमुख अशा सहस्रो लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या वेळी दिल्लीतील शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने प्रदर्शन पाहिले. विद्यार्थ्यांनी शिवकालीन शस्त्रांची बनावट, त्यांतील बारकावे, त्यांचा उपयोग आणि त्यामागील विज्ञान प्रत्यक्ष जाणून घेतले. हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु चारुदत्त पिंगळे, धर्मप्रचारक सद्गुरु नीलेश सिंगबाळ आणि सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस यांनी विद्यार्थ्यांशी आणि पालकांशी संवाद साधत, इतिहासातून राष्ट्रप्रेरणा घेऊन समाजकार्य व राष्ट्रकार्यात योगदान देण्याचे आवाहन केले.

शिक्षिका श्रीमती सारिका शर्मा म्हणाल्या, ‘विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शस्त्र हाताळत इतिहासाची अनुभूती घेतली. या अनुभवामुळे त्यांच्यात राष्ट्रगौरव आणि आत्मसन्मान जागृत झाला.’ विद्यार्थिनी कु. पूजा कौशिक म्हणाली, ‘छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या कार्यातून मला राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळाली,’ तर कु. आराध्या (इयत्ता ७ वी) म्हणाली, ‘मी मोठी होऊन झाशीच्या राणी लक्ष्मीबाईप्रमाणे राष्ट्रासाठी कार्य करणार!’ या प्रदर्शनामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि समाजातील सर्व स्तरांमध्ये स्वाभिमान, शौर्य आणि सनातन संस्कृतीबद्दल अभिमानाची भावना दृढ झाली आहे. ‘शौर्यजागरापासून राष्ट्रजागरापर्यंत’ या ध्येयाने आयोजित हे प्रदर्शन दिल्लीच्या सांस्कृतिक इतिहासातील प्रेरणादायी उपक्रम ठरला आहे.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# लग्नाच्या खोट्या अमिषाखालील बलात्काराच्या आरोपातून सुटका: सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

## प्रेमाचा शेवट तुरुंगात होऊ नये; कायद्याचा गैरवापर टाळावा - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** सर्वोच्च न्यायालयाने एका महत्वपूर्ण निकालात, लग्नाच्या खोट्या अमिषाखाली महिलेवर वारंवार बलात्कार केल्याचा आरोप असलेल्या एका वकिलाविरुद्धचा खटला रद्द केला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, हे लैंगिक संबंध परस्पर संमतीने होते आणि लग्नाच्या कोणत्याही खोट्या अमिषाने प्रभावित नव्हते. महिलेचे आरोप असत्य असून, परस्पर संमतीने असलेले संबंध नंतर कटू झाल्यावर दाखल केलेले हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे, असे मत न्यायालयाने नोंदवले.

या निकालावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशन, जालनाचे कार्याध्यक्ष, ड. महेश धनावत यांनी म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण आणि स्वागतार्ह आहे. प्रेमसंबंध तुटल्यानंतर प्रत्येक प्रकरणाला बलात्काराचे स्वरूप देणे हे कायद्याच्या गंभीरतेवर आघात करते. प्रेमाचा शेवट तुरुंगात होऊ नये. या निकालामुळे कायद्याचा गैरवापर करणाऱ्या प्रवृत्तींना आळा बसेल आणि खऱ्या पीडितांना न्याय मिळण्यास मदत होईल. भारतीय संस्कृतीत विवाहाला एक पवित्र बंधन मानले जाते. त्यामुळे, तरुणी आणि महिलांनी कोणतेही संबंध प्रस्थापित करताना अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे आणि भावनिक निर्णयांच्या आहारी जाऊ नये.

**न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण:**

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा आदेश रद्द करताना म्हटले की, बलात्कारासारखा गंभीर गुन्हा केवळ अशा प्रकरणांमध्येच लावला पाहिजे, जिथे लैंगिक हिंसा, जबरदस्ती किंवा मुक्त संमतीचा अभाव असतो. प्रत्येक अयशस्वी संबंधाला बलात्काराच्या गुन्ह्यात रूपांतरित केल्याने केवळ गुन्ह्याची गंभीरता कमी होत नाही, तर आरोपीवर न पुसणारा कलंक लागतो आणि त्याच्यावर गंभीर अन्याय होतो. फौजदारी न्याययंत्रणेचा अशा प्रकारे होणारा गैरवापर ही एक गंभीर चिंतेची बाब आहे आणि त्याचा निषेध केला पाहिजे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी:**

हे प्रकरण मार्च २०२२ ते मे २०२४ या काळातील संबंधांशी संबंधित होते. आरोपी आणि महिला यांच्यात अनेक वेळा लैंगिक संबंध आले होते. महिलेने स्वतः तिच्या भूतकाळातील वैवाहिक वादामुळे आरोपीच्या लग्नाच्या प्रस्तावाला विरोध केला होता. मात्र, नंतर तिने आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३७६, ३७६(२)(एन) आणि ५०७ अंतर्गत बलात्काराचा गुन्हा दाखल केला आणि आरोप केला की आरोपीने लग्नाच्या खोट्या अमिषाखाली तिच्यावर वारंवार बलात्कार केला.

**सर्वोच्च न्यायालयाचा युक्तिवाद:**

सहमती आणि लग्नाचे वचन: न्यायालयाने नमूद केले की, भारतीय समाजात जिथे विवाहाला खोल सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे, तिथे एखादी स्त्री लग्नाच्या आश्वासनावर विश्वास ठेवून लैंगिक संबंधांना संमती देऊ शकते. अशा परिस्थितीत, तिची संमती लग्नाच्या वचनावर अवलंबून असते. जर हे वचन खोटे, वाईट हेतूने आणि केवळ महिलेचे शोषण करण्याच्या उद्देशाने दिले गेले असेल, तर अशी संमती कलम ३७६ अंतर्गत अवैध मानली जाऊ शकते. तथापि, हे तत्त्व केवळ विश्वसनीय पुरावे आणि ठोस तथ्यांच्या आधारेच लागू केले जाऊ शकते, केवळ आरोप किंवा गृहितकांवर नाही.

दीर्घकाळ चाललेले संबंध: न्यायालयाने म्हटले की, हे प्रकरण असे नाही की जिथे आरोपीने केवळ शारीरिक सुखासाठी महिलेला आमिष दाखवले आणि नंतर तो नाहीसा झाला. हे संबंध तीन वर्षे टिकले, जो एक मोठा कालावधी आहे. ते भावनिकरित्या एकमेकांशी जोडलेले होते. अशा परिस्थितीत, केवळ संबंध लग्नात रूपांतरित होऊ शकले नाहीत म्हणून भूतकाळात झालेल्या शारीरिक संबंधांना बलात्काराचे स्वरूप देता येणार नाही. महिलेचा विरोधाभास: न्यायालयाने हे देखील निदर्शनास आणले की, जेव्हा जेव्हा आरोपीने लग्नाचा विषय काढला, तेव्हा महिलेने स्वतःच त्या प्रस्तावाला विरोध केला होता. अशा परिस्थितीत, शारीरिक संबंध लग्नाच्या आश्वासनावर आधारित होते, हा तिचा दावा टिकू शकत नाही. कायद्याचा आधार: न्यायालयाने महेश दामू खरे विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि रजनिश सिंग विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या प्रकरणांचा संदर्भ दिला, ज्यात असे म्हटले गेले आहे की, जोपर्यंत हे सिद्ध होत नाही की शारीरिक संबंध केवळ लग्नाच्या वचनामुळेच होते आणि इतर कोणत्याही विचाराने प्रभावित नव्हते, तोपर्यंत संमती चुकीच्या माहितीवर आधारित होती असे म्हणता येणार नाही. हा महत्त्वपूर्ण निकाल देताना, न्यायालयाने आरोपीविरुद्धचा खटला रद्द केला आणि फौजदारी कायद्याचा गैरवापर रोखण्याच्या गरजेवर भर दिला.

# जैन विकास आर्थिक महामंडळास विविध योजनांसाठी निधी मंजूर



**घनसावंगी । प्रतिनिधी -** जैन समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जैन विकास आर्थिक महामंडळास हिवाळी अधिवेशनात भाग भांडवल व इतर प्रलंबित निधी मंजूर करण्यात आले. महामंडळाचे अध्यक्ष मा. ना. ललित गांधी यांनी माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व अजित दादा पवार यांच्याकडे सातत्याने केलेल्या प्रभावी पाठपुराव्यामुळे या मागणीला यश आले आहे.

या निधी मंजुरीसाठी अल्पसंख्यांक मंत्री मा. ना. माणिकरावजी कोकाटे व अल्पसंख्यांक राज्यमंत्री मा. माधुरीताई मिसाळ यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

या निधीच्या माध्यमातून जैन समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व उद्योजकतेच्या सक्षमीकरणासाठी विविध विकासात्मक योजना लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

तसेच केंद्र सरकारकडून जैन समाजाच्या विकासासाठी १०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित असल्याची माहिती देण्यात आली.

ही माहिती संदीप भंडारी, समन्वयक, जैन अल्पसंख्यांक विकास आर्थिक महामंडळ यांनी दिली.

# नायलॉन मांजराच्या बाबतीत पोलिस प्रशासन सज्ज; जनतेनेही तत्परता दाखवावी

नायलॉन मांजाच्या बाबतीत सर्वांचेच सहकार्य आवश्यक आहे. तेव्हाच यावर अंकुश लावता येईल.यावर्षी सुध्दा मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्रात नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीवर बंदी आहेच. तरीही आतापासूनच नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीला सुरूवात झाल्याचे दिसून येते.याच अनुषंगाने नागपूरसह राज्याच्या अनेक भागात पोलिस प्रशासनाने नायलॉन मांजा खरेदी-विक्री करणाऱ्यांच्या मुस्क्या आवळायला सुरूवात केली व लाखो रुपयांचा मांजा जप्त करण्यात येत आहे.याकरीता पोलिस विभागाची जेवढी प्रशंसा कराल तेवढी कमी आहे. कारण मकरसंक्रांतीला एक महिना वेळ आहे तरीही आतापासून नायलॉन मांजाधारी पतंगीच्या मैदानात उतरले आहेत त्याच पध्दतीने पोलिस विभागाने आपल्या कायद्याची धार मजबुत करून लाखोंचा मांजा पकडल्याचे दिसून येते. नागपूरात सर्वाधिक नायलॉन मांजाची आवक अवैध पध्दतीने उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते आणि येथुनच महाराष्ट्रातील अनेक भागांत पुरवठा केला जात असावा.म्हणजेच नायलॉन मांजा धोका अजुनपर्यंत संपलेला नाही. त्यामुळे नायलॉन मांजावर बंदी असुन सुद्धा विक्री होवू शकते याला नाकारता येत नाही. याचे जिवंत उदाहरण सर्वांसमोर आहेच.नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्षांसाठी जीवघेना व घातक आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा बहिष्कार सर्वच स्तरातून होने अत्यंत गरजेचे आहे. संक्रांत म्हटली की पतंग आलीच पतंगी शिवाय संक्रांत अधुरी असल्याचे लहान मोठ्याना वाटत असते. परंतु काही नागरिक व मुलं यांनी जर चुकीचा मार्ग अवलंबवीला किंवा निष्काळजीपणा केली तर मोठ्या प्रमाणात जिवीत हानी होवू शकते याला नाकारता येत नाही. नायलॉन मांजाच्या बंदीबद्दल गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक संघटना, संस्था,पोलिस प्रशासन, सोशल मीडिया, वृत्तपत्रे यांनी नेहमीच आवाज उचलत आहे आणि गेल्या १० वर्षात अनेक दुर्घटना होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत हानीसुध्दा झाल्याचे सर्वांनाच ग्यात आहे.यात काहींना आपला प्राण सुध्दा गमवावा लागला. कायद्याच्या माध्यमातून मागील सहा वर्षापासून नायलॉन मांजावर पुर्णतः बंदी घालण्यात आली आहे.तरीही राज्यात सध्याच्या परिस्थितीत नायलॉन मांजा विक्रीला येण्याची चिन्हे दिसत आहेत. मागील वर्षी नायलॉन मांजामुळे नागपुरमध्ये ४०० हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात व पशुपक्षांच्या ७०० हुन अधिक दुर्घटना झाल्याचे निदर्शनास आले.यावरून आपण समजू शकतो की संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला आणखी कीतीतरी भयावह घटना झाल्या असाव्यात.त्याचप्रमाणे मागीलवर्षी गुजरातमध्ये पतंगबाजीमध्ये ८०० हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात यात छतावरून पडुन १०० हुन अधिक घायल झालेत व १० पेक्षा जास्त जनांचा मांजाणे गळा कापुन मृत्यू झाला अशा भयानक घटना नायलॉन मांजामुळे राज्यासह देशातील वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या आहेत.म्हणजेच यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रातील नायलॉन मांजाच्या दुर्घटना कमी न होता वाढतच आहे. त्यामुळे पतंगीच्या नादात जीवीत हाणी केव्हाही ओढावु शकते याला नाकारता येत नाही.त्यामुळे सावधगिरीचे उपाय म्हणून घरातील परिवाराने व मुख्यत्वे करून पालकांनी डोळ्यात तेल घालून मुलांवर करडी नजर ठेवण्याची गरज आहे.कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता नायलॉन मांजाचा बहिष्कार अत्यंत आवश्यक आहे.या भयानक घटनेमुळे नायलॉन मांजाला जिवघेना मांजाच म्हणावा लागेल.भारतात अनेक भागात नायलॉन मांजामुळे मानवी व पशुपक्षांच्या हजारो दुर्घटना दरवर्षी होत असतात. एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर विजेचे तार एकमेकांवर आदळतात व त्याचा स्पार्क होतो अशा वेळेस पतंग उडविणाऱ्याला कदाचित आपला प्राणसुध्दा गमवावा लागतो.त्यामुळे मी सर्व पतंग शौकीनांना विनंती करेल की नायलॉन मांजाला टाटा बाय बायकरून कॉटनच्या धाग्याने पतंग उडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.सर्वांना माहीत आहे की दरवर्षी नायलॉन मांजामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी, मोठ्या प्रमाणात दुर्घटना व वेळप्रसंगी यात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागतात.त्याच प्रमाणे अनेक पशु - पक्षांनासुध्दा आपले प्राण गमवावे लागतात.पक्षांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती अत्यंत गंभीर,भयावह व बिकट आहे.कारण आज वाढत्या प्रदूषणामुळे त्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. पक्षांना हवेत जास्त वेळ रहावे लागते. त्यामुळे त्यांना प्रदुषणाचा व आता नायलॉन मांजाचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागतो आहे .संक्रांतीच्या शुभपर्वावर नायलॉन मांजामुळे पक्षांची जिवीत हानी होणार नाही याची काळजी व जबाबदारी आतापासूनच जनतेने घ्यावी.पोलिस विभाग याबाबत सतर्कता बाळगुन लाखो रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करून योग्य कारवाई करीत आहे. परंतु जनतेनीही पोलिस विभागाला संपूर्ण सहकार्य केले पाहिजे.नायलॉन मांजा हा मांजा नसुन जहरीली तलवारआहे कारण आपला किंवा पक्षांचा गळा कळत न कळत केंव्हाही कापु शकते.मागील वर्षी अनेकांचा मांजराने गळा कापल्या गेला यात ते गंभीर जख्मीसुध्दा झालेत. त्यामुळे पतंग उडविताना सावधगिरीने पतंग उडवावी व नायलॉन मांजाचा बहिष्कारकरावा.पतंग उडवा परंतु जीवाशी खेळु नका यातच सर्वांचा आनंद आहे. कारण छोटीशी चूक मोठी दुर्घटना ओढावू शकते याला नाकारता येत नाही. संक्रांतिचा आनंद अवश्य घ्यावा! परंतु जिवावर बितण्यालायक कोणतेही कृत्य होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी.यातच सर्वांचा आनंद आहे.कायदा व पोलीस विभाग आपले कार्य मोठ्या शिताफीने आणि ताकदीनिशी करीत आहे.परंतु आपणच तटस्थ रहालो तर नायलॉन मांजावर अवश्य मात करू शकतो याला नाकारता येत नाही.सध्याच्या अत्याधुनिक युगात नायलॉन मांजाची विक्री ऑनलाईनेसुध्दा होवू शकते.मकरसंक्रांतीच्या पाश्वभूमीवर प्रशासन आतापासूनच प्लास्टिक पतंग आणि नायलॉन मांजा जप्तीची कारवाई युद्ध पातळीवर करीत आहे यात शंका नाही.सरकारने ऑनलाईन नायलॉन मांजावरील विक्रीवर बंदी आणायला हवी.अशा कठीण परीस्थितीत नायलॉन मांजाला रोखण्यासाठी प्रशासनापेक्षा समाजाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. तेव्हाच नायलॉन मांजा हद्दपार होवु शकतो. याकरिता प्रशासन व आम जनता यांच्यात समन्वय असने गरजेचे आहे. यावर सरकारने जातीने लक्ष दीले पाहिजे व जनतेनीसुध्दा यावर लक्ष ठेवण्याची अत्यंत गरज आहे. पालकांनी आतापासूनच आपल्या मुलांना नायलॉन मांजा पासुन दुर ठेवण्याचा काटेकोरपणे प्रयत्न करावा व नायलॉन मांजराचे दुष्परिणाम समजून सांगावे. सरकार व पोलीस विभाग यावर लक्ष ठेवुन आहेत.परंतु नागरिकांचेसुध्दा कर्तव्य आहे की जी वस्तु घातक आणि जिवघेनीआहे आणि ती आपण रोखु शकतो ती रोखलीच पाहिजे.यामुळे अपघातावर आळा बसेल व पशुपक्षांचे प्राण वाचतीलपतंगीचा आनंद भरपूर घ्या.परंतु नायलॉन मांजाला हद्दपारकरा. नायलॉन मांजा बद्दल नागरिक सतर्क राहले तर नायलॉन मांजराची विक्री होणारच नाही व प्रशासनाला कारवाईची गरजसुध्दा भासणार नाही. त्यामुळे नागरिकांनी सर्वप्रथम सतर्क रहाने गरजेचे आहे. नायलॉन मांजामुळे होणारे अपघात सांगुन येत नाही ते केंव्हाही कधीही होवु शकतात. त्यामुळे नायलॉन मांजाला रोखण्याचे काम सर्वप्रथम नागरिकांचे आहे,मग प्रशासनाचे राहील. सावधगिरीचे उपाय म्हणुन मी सांगू इच्छितो की मुलांनी कटलेल्या पतंगीच्या मागे धावु नये,वाहन चालकांनी कटलेल्या पतंगीच्या धाग्यापासुन सावधानी बाळगावी, घरून निघताना गळ्याला दुपट्टा बांधावा.सर्व अपघात टाळा मानव व संपूर्ण प्राणीमात्रांचे प्राण वाचवा.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

## राज्यस्तरीय सबज्युनीयर टेनिक्काईट स्पर्धा उत्साहात संपन्न

# वाशीम प्रथम तर नागपुर ग्रामीण दुसऱ्या स्थानावर

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र टेनिक्काईट असोसिएशनच्या मान्यतेने जालना जिल्हा टेनिक्काईट असोसिएशनच्या वतीने दिनांक १२ ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे आयोजीत ३८ व्या सब ज्युनीयर राज्यस्तरीय टेनिक्काईट अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ प्रचंड प्रतिसादासह उत्साहात संपन्न झाल्या. स्पर्धेमध्ये २३ जिल्ह्यांचे मुलांचे २१ संघ तर मुलींचे १७ संघ सहभागी झाले होते. यातुनच केरळ येथे होणार्या राष्ट्रीय स्पर्धेकरीता महाराष्ट्राचा संघ निवडण्यात आला असुन त्यामध्ये नैतीक वर्मा (वाशीम), ललीत तिवारी (नागपुर शहर), तन्मय लावारवार (वाशीम), आराध्य गुंजाळ (अ.नगर), साहिल राठोड (वाशीम), समर्थ म्हस्के (जालना) यांची मुलांच्या संघात तर मुलींच्या संघात डिंपल काळे (नागपुर ग्रामीण), अवंतीका कुर्लेकर (पुणे शहर), श्रद्धा बनसोड (नागपुर शहर), अबोली वासनीक (नागपुर शहर), अक्षरा ठाकरे (नागपुर ग्रामीण), प्रणाली फुलारी (जालना) यांची निवड करण्यात आलेली आहे.

स्पर्धेचे बक्षीस वितरण महाराष्ट्र टेनिक्काईट असोसिएशचे महासचिव अनिल वर्पे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले, यावेळी प्रमुख उपस्थिती मध्ये जालनाचे जेष्ठ पत्रकार कैलास फुलारी, युनायटेड क्रिकेट असोसिएशनचे सचिव ॲड. अमजद पठाण, महाराष्ट्र टेनिक्काईट असोसिएशनचे कोषाध्यक्ष तथा रेफ्री बोर्ड चेअरमन ॲड. मृणाल बांडेबुचे, कनव्हेनर लकी समुद्रे, तांत्रीक समीतीचे कृष्णा ठाकरे, आयोजन समीतीचे अध्यक्ष शेख अहेमद हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन स्पर्धेचे मुख्य आयोजक शेख चाँद पी.जे. यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जालना जिल्हा टेनिक्काईट असोसिएशनचे अध्यक्ष जयंत राजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उमेशचंद्र खंदारकर, गणेश लांडगे, अमोल काटकर, श्रीमती शेख महेजबीन, श्रीमती गिता संगम, श्रीमती करूणा निरेवाड, सुरेश त्रिभुवन, प्रविण जाधव, सचिन मोहीते, जावेद पठाण, अमीर पठाण, शेख साबेर, महाराष्ट्र टेनिक्काईट असोसिएशन व जालना जिल्हा टेनिक्काईट असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य यांनी परीश्रम घेतले.

**अन्नामृत फाऊंडेशनच्या वतीने खेळाडुंना भोजनाचा पुरवठा**

राज्यस्तरीय टेनिक्काईट स्पर्धे साठी आलेल्या सर्व खेळाडु, प्रशिक्षक, पंच व पदाधिकारी तसेच जालना चे आयोजन समीतीचे सर्व सदस्य यांना अन्नामृत फाऊंडेशनच्या वतीने उत्कृष्ठ, पौष्टीक व गरमागरम भोजनाचा पुरवठा करण्यात आला. यासाठी जिल्ह्याचे जेष्ठ समाजसेवक सुनीलभाई रायठठ्ठा यांचे सहकार्य लाभले. भोजनाच्या पुरवठ्यावर फाऊंडेशनचे व्यवस्थापक गणेश नखाते हे जातीने लक्ष ठेवुन होते. जेवनाचा आनंद संपुर्ण महाराष्ट्राने घेतला व असे जेवण आजपर्यंत कोणत्याही स्पर्धेत खायला भेटले नाही, जेवण खुपच चविष्ठ व पौष्टीक होते असे मत जवळपास सर्वच व्यवस्थापक व खेळाडुंनी व्यक्त करत अन्नामृत फाऊंडेशनचे आभार व्यक्त केले.

**स्पर्धेला विविध मान्यवरांनी भेट देवुन शुभेच्छा व्यक्त केल्या**

स्पर्धेदरम्यान विविध मान्यवरांनी भेट देवुन आलेल्या खेळाडुंना शुभेच्छा दिल्या व आयोजकांचे अभिनंदन केले. यात प्रामुख्याने माजी नगराध्यक्ष भास्कररावजी अंबकेर, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सौ. सिमा काकडे, माजी नगरसेवक पिंटु रत्नपारखे, मुख्याध्यापक सुभाष पारे, क्रीडा संघटक विजय गाडेकर, अनील मांटे यांचा समावेश आहे.

**स्पर्धेचा अंतीम निकाल**

सर्वसामान्य विजेते पद : प्रथम - वाशीम जिल्हा, व्दितीय नागपुर ग्रामीण जिल्हा, तृतीय नागपुर शहर जिल्हा.

एकेरी : मुले - प्रथम - नैतीक वर्मा (वाशीम), द्वितीय - ललीत तिवारी (नागपुर शहर), तृतीय - तन्मय लावारवार (वाशीम), चतुर्थ - आराध्य गुंजाळ (अ.नगर), मुली - प्रथम - डिंपल काळे (नागपुर ग्रामीण), द्वितीय - अवंतीका कुर्लेकर (पुणे शहर), तृतीय - श्रद्धा बनसोड (नागपुर शहर), चतुर्थ - अबोली वासनीक (नागपुर शहर).

दुहेरी : मुले - प्रथम - प्रथमेश व साहिल (वाशीम), द्वितीय - सुमीत व दया (पिंपरी चिंचवड), तृतीय - गौरव व सम्राट (सांगली), चतुर्थ - खुशाल व समर्थ (भंडारा), मुली - प्रथम - अक्षरा व अलिशा (नागपुर ग्रामीण), द्वितीय - आराध्या व आरोही (वाशीम), तृतीय - शिवरानी व प्राची (सांगली), चतुर्थ - तन्वी व स्वामीनी (अ. नगर).

मिश्र दुहेरी : प्रथम - देवेद्रं व मानसी (जळगाव), द्वितीय - ओम व संस्कृती (नांदेड), तृतीय - देवाशीश व वैष्णवी (पुणे शहर), चतुर्थ - मोहम्मद अयान व संस्कृती (पिंपरी चिंचवड).









**आचारसंहिता लागतात जालना शहर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी झेंडे बॅनर व इतर साहित्य जमा करण्यात आले.** **(छायाचित्र किरण खानापुरे)**

# आता भारत डिवचणाऱ्यांना सोडत नाही! - संजय सेठ, संरक्षण राज्यमंत्री

**नवी दिल्ली - । प्रतिनिधी -** भारत भूमी छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या शौर्याची आणि विश्वकल्याण इच्छिणार्या सनातनी संस्कृतीची आहे. दुर्दैवाने मागील ६० ते ६५ वर्षांत आपल्याला अकबर-बाबरसारख्या आक्रमकांना ‘महान’ म्हणत गुलामगिरीच्या मानसिकतेत बंदिस्त केले गेले. गुलामगिरीची ती सारी चिन्हे आणि बेड्या पूर्णपणे तोडल्या जात आहेत. आता नवीन भारत जागा झाला आहे. जो कुणापुढेही झुकत नाही आणि ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये आपल्या सैनिकांनी दाखवलेले शौर्य जगासमोर सिद्ध झाले आहे. आता भारताला डिवचणार्याला आम्ही सोडत नाही, असे प्रतिपादन केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. संजय सेठ यांनी केले. ते नवी दिल्ली येथील भारत मंडपम् येथील ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’तील ‘राष्ट्रीय सुरक्षिततेत सामाजिक-सांस्कृतिक संस्थांचे योगदान’ या विषयावर बोलत होते.

**श्रीराम मंदिरासाठीचा न्यायालयीन लढा ही श्रीरामाने दिलेली अनुभूतीच ! - अधिवक्ता श्रीधर पोतराजू**

सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता श्रीधर पोतराजू म्हणाले, ‘श्रीराम मंदिरासाठी हिंदूंनी न्यायालयाबाहेर दिलेला लढा अपूर्व आहे; मात्र आम्ही अधिवक्त्यांनी त्याविषयी न्यायालयात दिलेला लढा म्हणजे श्रीरामाने आम्हा सर्वांसाठी दिलेली त्याच्या अस्तित्वाची अनुभूतीच आहे. श्रीरामाच्या कृपेमुळेच ऋषितुल्य ज्येष्ठ अधिवक्ता केशव परासरन् यांनी वयाच्या ९२ व्या वर्षीही हा लढा जोमाने दिला.

## नागपूर हिवाळी अधिवेशन राष्ट्रकुल संसदीय मंडळ अभ्यासवर्गात मुक्त विद्यापीठाच्या सहा विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग



**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या सहा विद्यार्थ्यांनी 'राष्ट्रकुल संसदीय मंडळ' अभ्यासवर्गात सक्रिय सहभाग घेतला. नागपूर येथे नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान दिनांक ०८ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत हा अभ्यासवर्ग संपन्न झाला.

लोकप्रशासन आणि राज्यशास्त्र विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संसदीय शासन प्रणाली आणि विधिमंडळ कामकाजाची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने सन १९६४ पासून राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा विधान भवन (मुंबई) यांच्यातर्फे दरवर्षी या अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या या अभ्यासवर्गाचे उद्घाटन राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधासभा उपाध्यक्ष श्री. अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सदर अभ्यासवर्गात संसदीय आयुधे, सत्ताधारी व विरोधी पक्षाचे महत्व आणि भूमिका, लोकशाही प्रणाली, कायदे निर्मिती प्रक्रिया, विधिमंडळ भूमिका, प्रसारमाध्यमे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना विधानसभा आणि विधानपरिषद, तेथील विविध शासकीय समित्या, ग्रंथालय यांची पाहणी करत प्रत्यक्ष कामकाजाची माहिती मिळाली. अभ्यासवर्गाचा समारोप केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री आ. श्री. नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या सहा दिवसीय अभ्यासवर्गासाठी राज्यातील १२ विद्यापीठांचे जवळपास ७२ विद्यार्थी उपस्थित होते. त्यात मुक्त विद्यापीठाकडून शैक्षणिक संयोजक डॉ. सुनील भारोडकर यांच्या नेतृत्वाखाली कु. मयूरी जामनिक, कु. दिव्या आंबेकर, श्री. आदित्य गावंडे, श्री. मोहन भांगरे, कु. अस्मिता ढेंबरे आणि श्री. विनायक यादव हे सहा विद्यार्थी सहभागी झाले. या विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा संचालक डॉ. नागार्जुन वाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.